अ) 75 मी. ब) 55 मी. क) 105 मी. ड) 595 मी.

9) एका कापड व्यापाऱ्याच्या दुकानात 425 मी. 60 सें.मी. लांबीचा निळ्या पडद्याचे कापड आणि 345 मी. 60 सें. मी. लांबीचा लाल पडद्याचे कापड आहे ,तर त्याच्या दुकानातील पडद्यांचे एकूण कापड किती?

अ) 645.75 मी. ब) 770.85 मी. क) 583.85 मी. ड) 846.75 मी.

10) 28 सें. मी. लांबीच्या दोरी पासून 7 सेंटीमीटर लांबीचे किती तुकडे करता येतील?

अ) 8 ब) 5 क) 4 ड) 7

11) एक फ्रॉक शिवण्यासाठी 3 मीटर लांबीचे कापड लागते, असे 38 फ्रॉक शिवण्यासाठी शिंपीला किती लांबीचे कापड लागेल?

अ) 104 ब) 114 क) 124 ड) 94

12) राजीव दररोज त्याच्या घरापासून शाळेपर्यंत अर्धा किलो मीटर चालतो, तर त्याने चाललेले अंतर मीटर मध्ये लिहा.

अ) 5000 मी. ब) 50 मी. क) 500 मी. ड) 5 मी.

**खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

13) लांबी मोजण्याची अनौपचारिक एकके कोणती?

14) लांबी 600 मी.मी .म्हणजे किती सें.मी?

15) किलोमीटरचे संक्षिप्त रूप सांगां.

16) लहान एककाचे मोठ्या एककात रूपांतर करण्यासाठी कोणती मूलभूत क्रिया कराल ?

17) एक मीटरच्या किती पट एक किलोमीटर आहे.

**खाली दिलेल्या लांबीच्या प्रमाणीत एककांच्या जोड्या जुळवा.**

18) 1 सेंटीमीटर 100 सेंटीमीटर

19) 1 किलोमीटर 10 मीटर

20) 1 मीटर 1000 मीटर

21) 1 डेका मीटर 100 मीटर

22) 1 हेक्टोमीटर 10 मिलिमीटर

**खालील उदाहरणे सोडवा.** **(दोन गुणांचे प्रश्न )**

23) 15 कि .मी.चे मीटर मध्ये रूपांतर करा.

24) 429 सेंटीमीटरचे मीटर मध्ये रूपांतर करा.

25) 22 मी. 71 सें. मी. व 14 मी. 30 सें. मी. ची बेरीज करा.

26) 54.650 कि. मी मधून 37.325 कि. मी. वजा करा.

**खालील उदाहरणे सोडवा.** **(3 गुणांचे प्रश्न )**

27) आनंदने 2 मीटर 80 सेमी लांबीचे पॅन्टचे कापड विकत घेतले ,त्यातील 1 मीटर 30 सेंटीमीटर लांबीचे कापड त्याने आपल्या लहान भावाला दिले, तर किती लांबीचे कापड आनंदकडे शिल्लक राहिले ?

28) अँथनीने फुलदाण्या सजविण्यासाठी 3मी.40 सें.मी. लांबीचा हिरवा नायलॉन दोरा व 4 मी.80 सें.मी.लांबीचा केसरी नायलॉन दोरा खरेदी केला ,तर त्याने खरेदी केलेल्या दोऱ्याची एकूण लांबी किती?

29) जर चार कामगार एका दिवसात 5.7 किलोमीटर रस्ता साफ करतात, तर त्यांनी 4 दिवसात साफ केलेल्या रस्त्याची लांबी किती?

30) जर एक शर्ट शिवण्यासाठी 2मी.25 सें. मी. कापड लागते, तर 8शर्ट शिवण्यासाठी किती कापड लागेल?

**खालील उदाहरणे सोडवा.** **(4 गुणांचे प्रश्न )**

31) 5 कामगारांनी मिळून गणवेश शिवून घेण्यास 9 मीटर कापड खरेदी केले ,ते कापड सर्वांना समान प्रमाणात वाटून घेतले. तर प्रत्येक कामगाराला किती लांबीचे कापड लागेल ?

32) रामूहळी येथील प्राथमिक शाळेत 18 विद्यार्थी आहेत. शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता यांच्याकडे 1854 सेंटीमीटर लांबीचे लाल रिबन आहे ,जर लाल रंगाची रिबन समान प्रमाणात विभागला ,तर प्रत्येक विद्यार्थ्याला मिळणारी लाल रिबनची लांबी मीटर मध्ये सांगा.

****************************

## पाठ 9: परिमिती व क्षेत्रफळ

**I ) योग्य उत्तर निवडून रिकाम्या जागा भरा.**

1. एका आयताकृती फळ्याच्या भोवती एक किड्याने एक फेरा पूर्ण केला तर किड्याने एका फेऱ्यात पूर्ण केलेले अंतर म्हणजे (सुलभ)

अ) परिमिती ब) क्षेत्रफळ क) लांबी ड) रुंदी

2. आयताच्या गुणधर्माबद्दल खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे. (सामान्य)

अ) आयत ही एक प्रतलीय आकृती आहे.

ब) आयताच्या विरुद्ध बाजू समान असतात.

क) आयताला लांबी रुंदी आणि उंची असते.

ड) आयताचे चारही कोन काटकोन असतात.

3. चौरसाची परिमिती त्याच्या लांबीच्या किती पट असते. (सामान्य)

अ) 4 पट ब) 2 पट क) 3 पट ड) 5 पट

4) 5 सेंटिमीटर बाजू असणाऱ्या चौरसाची परिमिती किती? (सुलभ)

अ) 12 सें.मी. ब) 20 सें. मी. क) 15 सें. मी. ड) 6 सें. मी.

5) कोणत्याही प्रतलीय आकृतीने व्यापलेली जागा म्हणजेच (सुलभ)

अ) परिमिती ब) क्षेत्रफळ क) लांबी ड) रुंदी

6) आयताच्या परिमाणांची संख्यां (सुलभ)

अ) 1 ब) 2 क) 3 ड) 4

7) आयतातील विरुद्ध बाजूंची संख्यां (सुलभ)

अ) 1 ब) 2 क) 3 ड) 4

8) एका आयताकृती खोलीची लांबी 4 मीटर व रुंदी 3 मीटर आहे, तर खोलीचे क्षेत्रफळ (सामान्य)

अ) 18 मी. ब) 12 चौ.मी. क) 16 चौ. मी. ड) 10 मी.

9) जर एका चौकोनी पुठ्ठ्याची परिमिती सेंटीमीटर आहे 36, तर त्याची लांबी (सुलभ)

अ) 9 सें.मी. ब) 12 सें. मी. क) 18 सें.मी. ड) 10 सें.मी.

10) एका चौरसाकृतीची परिमिती 8 सेंटीमीटर आहे तर त्याचे क्षेत्रफळ


अ) 7 चौ. सें. मी. ब) 4 चौ.सें.मी. क) 6 चौ. सें. मी. ड) 5 चौ.सें.मी.

11) एका चौकोनी खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ 36 चौ. सें. मी. आहे,तर त्याची परिमिती

अ) 12 सेंमी. ब) 36 सें.मी. क) 24 सें.मी. ड) 16 सें. मी.


2) दिलेल्या आकृतीची परिमिती

अ) 12 सें. मी. ब) 24 सें. मी. क) 18 सें. मी. ड) 16 सें. मी.





13) खाली दिलेली आयताची लांबी चौरसामध्ये विभागलेली आहे, तर त्याचे क्षेत्रफळ

अ) 15 चौसेमी   ब) 18 चौसेमी   क) 12 चौसेमी   ड) 20 चौसेमी



14) दिलेल्या आकृतीत बाहेरील चौकोनाचे क्षेत्रफळ 25 चौसेमी आहे, आतील आकृतीचे क्षेत्रफळ 9 चौसेमी आहे. तर दोन्ही आकृतींच्या मधील जागेचे क्षेत्रफळ काढा .


अ) 20 चौ सेमी   ब) 26 चौ सेमी   क) 10 चौ सेमी   ड) 16 चौ सेमी




(सुलभ)

15) दिलेल्या आयताची परिमिती

अ) 14 मी.   ब) 10 मी.   क) 8 मी.   ड) 6 मी.




**II) यादी A मध्ये समताल आकृत्या दिलेल्या आहेत व यादी B मध्ये त्यांच्याशी संबंधित सूत्रांशी जोड्या लावा व लिहा.**

| A | B |
|---|---|
| 16) आयताची परिमिती | लांबी × रुंदी |
| 17) चौरसाची परिमिती | बाजू × बाजू |
| 18) आयताचे क्षेत्रफळ | 2( लांबी +रुंदी) |

19) चौरसाचे क्षेत्रफळ 4 × बाजू

**III) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा** **( एक गुणांचे प्रश्न)**

20) दोन परिमाणे असलेल्या आकृत्यांना काय म्हणतात.

21) आयताची दोन परिमाणे कोणती?

22) आयताची परिमिती ही त्याच्या लांबी व रुंदीच्या बेरजेच्या किती पट असते ?

23) चौरसाची दोन परिमाणे सांगा.

24) चौरस एकक म्हणजे काय ?


25) क्षेत्रफळाचे एकक काय ?

**IV) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **( दोन गुणांचे प्रश्न)**

26) एका आयताकार शेताची लांबी 150 मी. व रुंदी 120 मी. आहे तर त्या शेताचे क्षेत्रफळ किती?

27) एका चौरसाकार मैदानाची लांबी 80 मीटर आहे तर परिमिती काढा.

28) दिलेल्या आकृतीची परिमिती व क्षेत्रफळ काढा.




29) एका खोलीतील जमीन पूर्ण झाकण्यासाठी गालीचा घालावयाचा आहे, जर खोलीची लांबी 16 मी. व रुंदी 5 मी. असेल तर लागणाऱ्या गालिचाचे क्षेत्रफळ किती?

30) एका चौरसाकार पत्र्याची लांबी 21 सेमी आहे, तर क्षेत्रफळ काढा.

31) कॅनव्हासच्या चौकोनी तुकड्याची लांबी 15 मी. आहे तर क्षेत्रफळ काढा.

**V) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(3 गुणांचे प्रश्न)**

32) एका आयताकृती बागेची लांबी 80 मी व रुंदी 50 मी आहे, तर बागेची परिमिती काढा. बागेभोवती काटेरी तारेचे पाच वेढे घालण्यासाठी लागणाऱ्या तारेची लांबी किती?

33) सकाळच्या वेळी श्रीलता आयताकृती मैदाना भोवती चालताना तीन फेरे पूर्ण करते. मैदानाची लांबी व रुंदी अनुक्रमे 320 मी व 210 मी आहे, तर ती एकूण किती मीटर चालते?

34) चौरसाकृती खोलीची लांबी 16 मीटर आहे ,खोलीच्या भिंतीला रंगीत कापडाचे 4 वेढे गुंडाळण्यासाठी किती लांबीचे रंगीत कापड लागेल?

35) एका चौरस मैदानाची लांबी 75 मीटर आहे, रिता मैदानाभोवती धावत 5 फेऱ्या पूर्ण करते,तर तिने धावलेले एकूण अंतर किती?

36) आयताकृती जागेची लांबी 25 मी.व रुंदी 15 मी. आहे तर त्या जागेचे क्षेत्रफळ काढा.जर 1 चौरस मीटर जागेची किंमत रु.250 असेल तर त्या जागेची एकूण किंमत काढा.

**VI) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(4 गुणांचे प्रश्न)**

37) चौरसाकृती खोलीची लांबी 400 सें.मी.आहे.10 सें.मी.लांबीच्या चौरसाकार फरशा खोलीच्या जमिनीवर घालावयाच्या आहेत, तर एकूण

किती फरशा लागतील?

38) एका सभामंडपाच्या भिंतीची लांबी 80 मीटर व रुंदी 30 मीटर आहे, भिंत सजविण्यासाठी रंगीत पताकांचे 4 वेढे घालण्यासाठी लागणाऱ्या पताकांची लांबी किती?1 मीटर पताकांची किंमत रुपये 15 असेल तर सभागृहाच्या भिंती सजविण्यासाठी एकूण किती खर्च येईल?

39) एका सभा मंडपाची लांबी 25 मी.व रुंदी 18 मी. आहे, जमिनीवर 3 मी. × 1मी.आकाराच्या दगडी फरशा घालावयाच्या आहेत, तर किती फरशा लागतील?

40) चौरसाकृती खोलीची लांबी 8 मीटर आहे. 2 मीटर ×1मीटर मापाचे ग्रॅनाईट दगड खोलीत जमिनीवर घालायचे आहेत,तर एकूण किती ग्रॅनाईट दगड लागतील?

********************************

## पाठ 10 : माहिती संग्रह

**I. खालील प्रश्नांना चार पर्याय दिलेले आहेत. योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा.**

1. माहिती संग्रहाच्या संदर्भात योग्य विधान. (साधारण)

A) माहिती संग्रह ,कोष्टक , वर्गीकरण ,विश्लेषण

B) माहिती संग्रह ,वर्गीकरण ,विश्लेषण ,कोष्टक

C) माहिती संग्रह ,वर्गीकरण ,कोष्टक , विश्लेषण

D) माहिती संग्रह , विश्लेषण ,वर्गीकरण ,कोष्टक

2. संग्रहित माहिती चित्र रूपात दाखवण्यासाठी आवश्यक असणारी गोष्ट. (साधारण)

A) चित्र. B ) नकाशा C) चौक नकाशा D ) चित्र नकाशा

3. माहिती उभ्या सरळ किंवा आडव्या स्तंभामध्ये दाखवण्याऱ्या आलेख . (साधारण)

A) कच्चा आलेख. B) स्तंभालेख C) चित्रालेख D ) चौकआलेख.

4. |||| हे चित्र दर्शवत असलेली संख्या. (सुलभ)

A) पाच B) सात C) सहा D) चाऱ

*** पस्तीस विद्यार्थ्यांच्या एका वर्गाची एका आठवड्याची हजेरी खालील कोष्टकात दाखवलेली आहे. त्यावरून प्रश्नांची उत्तरे द्या.**

| वार | एक वर्तुळ = पाच विद्यार्थी | हजार विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| सोमवार | ○○○○○○ | 30 |
| मंगळवार | ○○○○○ | 25 |
| बुधवार | ○○○ | 15 |
| गुरुवार | ○○○○○○○ | 35 |
| शुक्रवार | ○○○○ | 20 |
| शनिवार | ○○ | 10 |

5. सर्वात जास्त उपस्थिती असणारा दिवस. (सुलभ)

A) सोमवार B) मंगळवार C) गुरुवार D) शनिवार

6. सर्वात कमी उपस्थिती असणारा दिवस (सुलभ)

A) बुधवार B) शनिवार C) शुक्रवार D) मंगळवार

7. सोमवारी हजर असणाऱ्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या . (सुलभ)

A) 25 B) 10 C) 35 D) 30

8. सर्व विद्यार्थी हजर असणारा दिवस (सुलभ)

A) सोमवार B) शनिवार C) गुरुवार D ) मंगळवार


9. मंगळवार आणि शुक्रवारी हजर असणाऱ्या विद्यार्थ्यांमधील फरक. (सुलभ)

A) 5 B) 15 C) 20 D) 10

10. बुधवारी गैरहजर असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या (सुलभ)

A) 30 B) 20 C) 25 D) 15

*** इयत्ता पहिली ते पाचवीच्या मुलांची हजेरी खालील स्तंभालेखात्त दर्शविलेले आहे त्यावरून त्या खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**




11. सर्वात जास्त उपस्थिती असणारी इयत्ता . (सुलभ)

A) पहिली B) तिसरी C) दुसरी D) चौथी

12. सर्वात कमी उपस्थिती असणारी इयत्ता. (सुलभ)

A ) दुसरी B ) पहिली C) तिसरी D) चौथी

13. पहिली , दुसरी आणि तिसरी इयत्तांची एकूण उपस्थिती. (सुलभ)

A) 55 B) 65 C) 75 D) 85

14. इयत्ता चौथीची उपस्थिती इयत्ता पहिलीच्या उपस्थितीच्या कितीने जास्त आहे? (साधारण)

A) 15 B) 25 C) 20 D) 35

15. रवीकडे दहा चेंडू आहेत आणि राजूकडे पाच चेंडू आहेत ही माहिती दाखवणारा योग्य चित्रालेख - (साधारण)

A)

| | | | |
|---|---|---|---|
| रवी | | | |
| राजू | | | |

B)

| | | |
|---|---|---|
| रवी | | |
| राजू | | |

C)

| | | | |
|---|---|---|---|
| रवी | | | |
| राजू | | | |

D)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| रवी | | | | |
| राजू | | | | |

16. जोड्या जुळवा. (साधारण)

| अनुक्रम नंबर | एकूण संख्या | गणिती खुणा |
|---|---|---|
| 1 | 7 | \|\|\|\|\| |
| 2 | 10 | \|\|\|\|\| \|\|\| |
| 3 | 4 | \|\|\|\|\| \|\| |
| 4 | 2 | \|\|\|\| |
| 5 | 5 | \|\|\|\|\| \|\|\|\|\| |
| 6 | 8 | \|\| |

**II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(प्रत्येकी दोन गुणाचे प्रश्न)**

17. चित्रालेख म्हणजे काय ? (साधारण)

18. स्तंभालेख म्हणजे काय ? (साधारण)

19.इयत्ता पाचवीच्या वर्गातील किती विद्यार्थ्यांना कोणती फळे आवडतात याची माहिती गोळा करण्यात आली .तर 10 विद्यार्थ्यांना सफरचंद, विद्यार्थ्यांना केळी, 3 विद्यार्थ्यांना पेरू आणि 8 विद्यार्थ्यांना डाळिंब आवडते. तर ही माहिती खालील कोष्टकामध्ये दर्शवा. (कठीण)


| फळाचे नाव | गणिती खुणा | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| सफरचंद | | |
| केळी | | |
| पेरू | | |
| डाळिंब | | |

20) एका कारखान्यात तयार झालेल्या विद्युत दिव्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे. तर ही माहिती चित्रालेखाच्या सहाय्याने दर्शवा.

| वार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| दिव्यांची संख्या | 50 | 40 | 60 | 20 | 30 | 40 |

**III. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा** **(प्रत्येकी तीन गुणाचे प्रश्न)** **(कठीण)**

21. खालील स्तंभालेख पाहून प्रश्नांची उत्तरे द्या.




1. या स्तंभालेखात दर्शवलेली माहिती कोणती ?

2. या स्तंभालेखात वापरलेले प्रमाण किती ?

3. प्रत्येक दिवशी मिळालेली रक्कम सांगा.

पहिला दिवस_______ दुसरा दिवस_______ तिसरा दिवस________

चौथा दिवस ______पाचवा दिवस_______

4. एकूण पाच दिवसात मिळालेली रक्कम किती ?

5. दुसऱ्या दिवशी आणि पाचव्या दिवशी मिळालेल्या रकमेतील फरक किती ?

6.प्रत्येक दिवसाची कमाई चढत्या क्रमात लिहा.

22. एका आठवड्यातील सहा दिवसांमध्ये एका दुकानदाराने काही पट्टे विक्री केले .त्याचे विवरण खालील प्रमाणे आहे. स्तंभालेख काढा.

| वार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| विक्री झालेले पट्टे | 20 | 30 | 45 | 35 | 25 | 20 |

स्केल : 1 सेंटीमीटर = पाच पट्टे.

1. सहा दिवसात विक्री झालेले एकूण पट्टे किती?

**IV) . खालील प्रश्नांची उत्तरे लिहा** **(प्रत्येकी चार गुणांचे प्रश्न) (कठीण)**

23. रामूच्या पिशवीत 5 पेन , 3 रबर, 6 पुस्तके, 2 पेन्सिली आणि 1 शार्पनर आहे. ही माहिती चित्रालेखाच्या सहाय्याने दर्शवा.

| **वस्तूचे नाव** | **वस्तूंची संख्या** | **चित्रांची संख्या** |
|---|---|---|
| पेन | | |
| पेन्सिल | | |
| रबर | | |
| शार्पनर | | |

24. एका सायकल कारखान्यात 2005 पासून 2009 पर्यंत तयार झालेल्या सायकलींची संख्या खालील प्रमाणे दिलेली आहे योग्य प्रमाणाचा उपयोग करून स्तंभालेखात ही माहिती दर्शवा.

| वर्ष | सायकलींची संख्या |
|---|---|
| 2005 | 800 |
| 2006 | 600 |
| 2007 | 900 |
| 2008 | 500 |
| 2009 | 700 |

1. सर्वात जास्त सायकली कोणत्या वर्षी तयार झालेल्या आहेत?

2. सर्वात कमी सायकली कोणत्या वर्षी तयार झालेल्या आहेत?

25. स्तंभालेख तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पायऱ्या कोणत्या?

****************************************************

## पाठ 11 : गुणाकार

**I. योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.**

1 ) एका संख्येला दुसऱ्या संख्येने गुणले असता येणाऱ्या संख्येला -

अ) भागाकार ब) बेरीज क) गुणाकार ड) वजाबाकी

2) 4×4×4×4×4×4 असल्यास खालीलपैकी कोणते उत्तर बरोबर आहे ?

अ) 4×6 चा गुणाकार ब) 4×6×4 चा गुणाकार क) 4 ला 6 ने गुणणे ड) 46 ला 1ने गुणणे

3) खालीलपैकी कोणती जोडी बरोबर जुळते . --------------×100=-------------

अ) 300×3000 ब) 30×30000 क)30×3000 ड) 30×300

4) 30×700 ची किंमत काढण्यासाठी, राम प्रथम 3×7 =21 लिहितो त्यात त्यांनी किती शून्य जोडावेत म्हणजे त्याला अपेक्षित किंमत मिळेल

अ) 3 ब) 2 क) 4 ड) 1

5) रवी घर रंगविण्यासाठी प्रति तासाला रु. 12 घेतो,जर त्याने 214 तास काम केले असेल, तर त्याची एकूण कमाई किती ?

अ) रु. 258 ब) रु. 428 क) रु. 2568 ड) रू. 4288

6) रिया आपल्या डिजिटल कॅमेरातून 42 फोटो काढते, नंतर ती संगणकावरील 3 फोल्डरमध्ये समान प्रमाणात ठेवते.रियाने प्रत्येक फोल्डरमध्ये किती फोटो ठेवले आहेत हे शोधण्यासाठी खालीलपैकी कोणत्या गुणधर्माचा वापर करता येईल ?

अ) 3×14 =42 ब) 3×40=120 क) 3×42=126 ड) 4×42=168

7) 13×------ =117 खालीलपैकी कोणते उत्तर बरोबर आहे ?

अ) 9 ब) 13 क) 19 ड) 22

8) सोड्याची एक बाटली 7 लहान सोड्याच्या कॅनच्या बरोबरीची आहे,जर प्रत्येक कॅनमध्ये आठ लिटर सोडा असेल तर एका बाटलीत किती सोडा असेल?

अ) 65 लिटर ब) 1 लिटर क) 56 लिटर ड) 15 लिटर

9) सीता,सीतेचा नवरा आणि 3 मुले अमेरिकेला जात आहेत,एका विमान तिकिटाची किंमत रुपये 179 आहे ,तर कुटुंबातील सर्व सदस्यांसाठी एकूण तिकिटाची रक्कम किती असेल?

अ) 395 ब) 895 क) 589 ड) 935

10) $(4 \times 5) \times 3 =$

अ) 40 ब) 90 क) 80 ड) 60

11) $5 \times 35 = \alpha$

अ) $\alpha = 185$ ब) $\alpha = 165$ क) $\alpha = 175$ ड) $\alpha = 195$

12) नरेंद्र एका तासाच्या व्यायामाने 354 कॅलरी कमी करतो ,गेल्या एका महिन्यात त्यांने एकूण 28 तास व्यायाम केला आहे,तर त्याने कमी केलेल्या कॅलरीज किती?

अ) 3010 कॅलरी ब) 8484 कॅलरी क) 9912 कॅलरी ड) 10266 कॅलरी

13) $156 \times 137$ चा गुणाकार शोधा.

14) $8261 \times 8$ चा गुणाकार शोधा.

15) $1908 \times 37$ चा गुणाकार शोधा.

16) $10093 \times 3$ चा गुणाकार शोधा.


17) $21497 \times 3$ चा गुणाकार शोधा.

18) $15746 \times 5$ चा गुणाकार शोधा.

19) $11048 \times 7$ चा गुणाकार शोधा.

20) $10039 \times 9$ चा गुणाकार शोधा.

21) गुणाकार वर्तुळ पूर्ण करा.




22) जर एका बॉक्समध्ये 276 सफरचंद असतील तर ,175 बॉक्समध्ये किती सफरचंद असतील ?

23) जर एका कारखान्यात महिन्याला 5376,बाहुल्या तयार होतात. तर त्या कारखान्यात दरवर्षी किती बाहुल्या तयार होतात ?

24) एका शाळेत 28 खोल्या आहेत, प्रत्येक खोलीत 32 विद्यार्थी आहेत,तर त्या शाळेत एकूण विद्यार्थी किती ?

25) सिद्धाप्पा हे फळाचे व्यापारी असून ते संत्र्यांची निर्यात करतात. एका पेटीमध्ये 144 संत्री असणाऱ्या 259 पेट्या त्यांनी निर्यात केल्या. तर त्यांनी निर्यात केलेल्या संत्र्यांची एकूण संख्या किती ?

26) एका संरक्षित अरण्यामध्ये आडव्या रांगेत 160 व उभ्या रांगेत 108 झाडांची लागवड केली आहे, तर तिथे लागवड केलेल्या झाडांची एकूण संख्या किती ?

*************************************

## पाठ 12 : भागाकार

**I) रिकाम्या जागा भरा .** **(प्रत्येकी एक गुण)**

1. वस्तूंना समान प्रमाणात विभागण्याच्या प्रक्रियेला ____ असे म्हणतात. (सुलभ)

2. गुणाकाराच्या विरुद्ध क्रिया_____. (सुलभ)

3. भाज्य = (____ × ____) + बाकी. (सुलभ)

4. भाजक 4, भागाकार 11 आणि बाकी 1 असताना भाज्य किती ? (सुलभ)

5. 420 ÷ 10 = 42. या भागाकार क्रियेतील भाज्य____ (सुलभ)

6. 72 ÷ 6 = 12. या भागाकार क्रियेतील भाजक ______ (सुलभ)

7. 64 ÷ 4 = 16. या क्रियेतील भागाकार______. (सुलभ)

8. 360 ÷ 9 ही क्रिया केल्यानंतर येणारी बाकी______. (सुलभ)

**II) खालील प्रश्नांचे एका वाक्यात उत्तरे द्या.** **(प्रत्येकी एक गुण)**

**9.** भाज्य म्हणजे काय ? (सुलभ)

**10.** भाजक म्हणजे काय ? (सुलभ)

**11.** भागाकार म्हणजे काय ? (सुलभ)

**12.** बाकी म्हणजे काय? (सुलभ)

**13.** भागाकार **6,** भाजक **7,** बाकी **4** असताना भाज्य किती ? (सुलभ)

**14.** **32** मधून **4** ही संख्या किती वेळा वजा करता येईल ? (सुलभ)

**III) खालील उदाहरणे सोडवा.** **(प्रत्येकी दोन गुण )**

**15.** **648 ÷ 12 = ?** (साधारण)

**16.** **56,083** ला **11** ने भाग द्या. (साधारण)

**17.** **32,493** ला **2** ने भाग द्या. (साधारण)

**18.** **2647** ला **13** ने भाग द्या. (साधारण)

**19.** **3647** ला **9** ने भाग द्या. (साधारण)

**IV) खालील उदाहरणे सोडवा.** **(प्रत्येकी तीन गुण)**

**20.** रमाकडे **32** चॉकलेट आहेत. ते चॉकलेट **8** जणांना समान वाटल्यास प्रत्येकाला किती चॉकलेट मिळतील ? (साधारण)

**21.** **17** विद्यार्थ्यांचा एक दिवसाचा खर्च **7,242** रुपये असल्यास प्रत्येकविद्यार्थ्याला द्यावे लागणारे पैसे किती ? (साधारण)

**22.** अनिताने **908** गोड पदार्थ आणले. आणि **25** जणांना वाटले .तर प्रत्येकाला मिळणारे गोड पदार्थ किती ? आणि अनिताकडे शिल्लक राहिलेले गोड पदार्थ किती? (साधारण)

**23.** एका शिंप्याकडे **18** मीटर शर्टाचे कापड आहे. त्यातून त्याने **9** शर्ट शिवले. तर प्रत्येक शर्ट शिवण्यासाठी लागणारे कापड किती ?

(साधारण)

**24.** एक कार **15** लिटर पेट्रोलमध्ये **240** किलोमीटर प्रवास करते. तर प्रत्येक लिटरला ती किती प्रवास करते ? (साधारण)

**25.** मंजुळा **1,116** रुपयांची **12** खेळणी खरेदी करते. तर प्रत्येक खेळण्याची किंमत किती ? (साधारण)

**26.** एका व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न **90,912** रुपये असल्यास त्याचे मासिक उत्पन्न किती? (साधारण)

**27.** एका कार उत्पादन कारखान्यात **13** महिन्यात **14,820** कार गाड्यांचे उत्पादन होते . तर एका महिन्यात उत्पादन होणाऱ्या कार गाड्यांची संख्या किती ? (साधारण)

**V) खालील समस्या सोडवा.** **(प्रत्येकी चार गुण)**

**28 .** एका समाजसेवा संघातील **175** दानशूर व्यक्तींकडून प्रत्येकी **125** रुपये देणगी मिळाली . संघाने ती देणगी **7** शाळांना समान वाटप केली. तर प्रत्येक शाळेला मिळणारी रक्कम किती ? (कठीण)

**29.** एका गावच्या शेजारील सरकारी जमिनीत अरण्य खात्याच्या वतीने आडव्या रांगेत **96** आणि उभ्या रांगेत **80** झाडे लावली. ही झाडे गावातील **12** लोकांनी दत्तक घेतली. तर प्रत्येकाच्या वाटणीला येणारी झाडे किती? (कठीण)

**30 .** एका संत्र्याच्या बागेत **82** झाडांना प्रत्येकी **60** संत्री मिळाली. शेतकऱ्याने ती संत्री **12** पेट्यांमध्ये भरली, तर प्रत्येक पेटीत किती संत्री भरावी लागतील ? (कठीण)

**31.** एका शाळेतील **15** विद्यार्थ्यांनी एक वाहन प्रति किलोमीटर **9** रुपये प्रमाणे भाड्याने घेतले. त्यांनी **325** किलोमीटर प्रवास केल्यास प्रत्येक विद्यार्थ्याला येणारा खर्च किती ? (कठीण)

**32.** अनिताची गाय एका दिवसाला **8** लिटर दूध देते. एक लिटर दुधाचा दर 18 रुपये आहे. दूध विकून एका महिन्यात मिळालेले पैसे ती आपल्या चार मुलांमध्ये वाटणी करते. तर प्रत्येक मुलाला मिळणारी रक्कम किती ? (कठीण)

*************************************

## पाठ 13 : बौद्धिक अंकगणित

**I .बहुपर्यायी प्रश्न**

1. एका शाळेत 395 विद्यार्थी आहेत, दशक स्थानापर्यंत विद्यार्थ्यांची अंदाजे संख्या काढा. (सुलभ)

A) 300 B) 400 C) 350 D)390

2. एका गावची लोकसंख्या 1275 आहे. शतक स्थानापर्यंत अंदाजे लोकसंख्या सांगा. (सुलभ)

A)1300. B) 1280. C)1250 D)1000

3. एका बुट्टीत 5791 फळे आहेत. त्यांची सहस्त्र स्थानापर्यंत अंदाजे संख्या सांगा. (सुलभ)

A) 5790 B) 5800 C) 6000 D) 5500

4. सरिता कडे 42,125 रुपये आहेत .ही संख्या दशसहस्त्र स्थानापर्यंत अंदाजे सांगा. (सुलभ)

A) 42,130. B) 42,100. C) 42000 D) 40000

5. एका धनगराकडे 45 बकरी आणि दुसऱ्या धनगराकडे 132 बकरी आहेत. बकऱ्यांची एकूण संख्या दशक स्थानापर्यंत अंदाजे सांगा.

A)18 B) 177 C) 200 D) 150. (साधारण)

**II) चूक की बरोबर सांगा .**

6. एखाद्या संख्येची ठराविक स्थानापर्यंत अंदाजे किंमत काढायची असल्यास त्या स्थानाच्या उजवीकडची संख्या विचारात घ्यावी. (कठीण)

7. अंदाजे किंमत काढायचे असल्यास संबंधित स्थानाच्या उजवीकडे संख्या पाच पेक्षा मोठी असल्यास पुढची संख्या धरावी. (कठीण)

**III) रिकाम्या जागा भरा.**

8. दशक स्थानी 1, 2, 3 किंवा 4 अंक असल्यास दशक आणि सुटे स्थानाची संख्या ______ मध्ये बदल करावी. (कठीण)

9. संख्येची दशसहस्त्र स्थानापर्यंत अंदाजे किंमत काढायची असल्यास ,सहस्त्र स्थानी 5,6,7,8 किंवा 9 असल्यास _____ स्थानाच्या संख्येत एक मिळवावा. (कठीण)

**IV) जोड्या जुळवा** (सुलभ)

10. 65,487 ची दशक स्थानापर्यंत अंदाजे किंमत A)65,000. (सुलभ)

11. 65, 487 ची शतक स्थानापर्यंत अंदाजे किंमत B)70,000. (सुलभ)

12. 65,487 ची सहस्त्र स्थानापर्यंत अंदाजे किंमत. C)65,500. (सुलभ)

13. 65,487 ची दशसहस्त्र स्थानापर्यंत अंदाजे किंमत. D)65,490. (सुलभ)

**V) खालील प्रश्नांचे उत्तरे द्या.**

14. 583 ची दशसहस्त्र स्थानापर्यंतची अंदाजे किंमत सांगा. (सुलभ)

15. 2837 ची दशक स्थानापर्यंतची अंदाजे किंमत सांगा . (सुलभ)

16. 3548 ची शतक स्थानापर्यंत अंदाजे किंमत सांगा. (सुलभ)

17. 5764 ची शतक स्थानापर्यंतची अंदाजे किंमत सांगा . (सुलभ)

18. 25,346 ची सहस्त्र स्थानापर्यंतची अंदाजे किंमत सांगा . (सुलभ)

19. 35,756 ची सहस्त्र स्थानापर्यंतची अंदाजे किंमत सांगा. (सुलभ)

20. 12,654 ची दशसहस्त्र स्थानापर्यंतची अंदाजे किंमत सांगा. (सुलभ)

21. 25,748 ची दशसहस्त्र स्थानापर्यंत अंदाजे किंमत सांगा. (सुलभ)

22. 7537 ची कमाल स्थानापर्यंत अंदाजे किंमत सांगा. (कठीण)

23. 3469 ची किमान स्थानापर्यंत अंदाजे किंमत काढा. (कठीण)

**VI) खालील उदाहरणे सोडवा . (दोन गुणांचे)**

24. 2462 आणि 3487 यांच्या बेरजेची दशक स्थानापर्यंत अंदाजे किंमत काढा. (साधारण)

25. 8743 आणि 7275 च्या बेरजेची शतक स्थानापर्यंत अंदाजे किंमत काढा . (साधारण)

26. 24,316 आणि 34,861 च्या बेरजेची सहस्त्र स्थानापर्यंत अंदाजे किंमत काढा. (साधारण)

27. 38,527 आणि 32,596 यांच्या बेरजेची दशक स्थानापर्यंत अंदाजे किंमत काढा. (साधारण)

28. 51,689 आणि 34, 685 च्या वजाबाकीची दशक स्थानापर्यंत अंदाजे किंमत काढा. (साधारण)

29. 86,853 आणि 47,829 यांच्या वजाबाकीची शतक स्थानापर्यंत अंदाजे किंमत काढा. (साधारण)

30. 80,808 आणि 55,055 यांच्या वजाबाकीची सहस्त्र स्थानापर्यंत अंदाजे किंमत काढा. (साधारण)

31. 77,777 आणि 44,444 यांच्या वजाबाकीची दश सहस्त्र स्थानापर्यंत अंदाजे किंमत काढा. (साधारण)

**VII) खालील उदाहरणे सोडवा . ( प्रत्येकी तीन गुण )**

32. 1249 आणि 48 यांच्या गुणाकाराची कमाल स्थानापर्यंत अंदाजे किंमत काढा. (साधारण)

33. 428 आणि 54 यांच्या गुणाकाराची किमान स्थानापर्यंत अंदाजे किंमत काढा. (साधारण)

34. 44,238 आणि 95 यांच्या भागाकाराची कमाल स्थानापर्यंत अंदाजे किंमत काढा. (साधारण)

35. 3265 आणि 58 यांच्या भागाकाराची किमान स्थानापर्यंत अंदाजे किंमत काढा. (साधारण)

**VIII) खालील उदाहरणे सोडवा .** **( प्रत्येकी चार गुण )**

36. एका रंगमंदिराच्या मालकाने नाटक प्रदर्शनासाठी तिकीट ठेवण्याचे ठरवले. जर रंगमंदिरात 88 आसनांच्या 198 ओळी असतील, तर आवश्यक तिकिटांची कमाल स्थानापर्यंत अंदाजे संख्या सांगा. (कठीण)

37. 8 चॉकलेटच्या पाकिटामध्ये एकूण 768 चॉकलेट आहेत. तर प्रत्येक पाकिटातील चॉकलेटांची संख्या अंदाजे सांगा. (कठीण)

38.एका तयार कपडे बनवणाऱ्या कंपनीने एका महिन्यात 16,783 शर्ट आणि 12,438 पॅन्ट तयार केल्या, तर तयार झालेल्या एकूण कपड्यांची दशसहस्त्र स्थानापर्यंत अंदाजे संख्या काढा . (कठीण)

39. वृत्तपत्र छपाई करणाऱ्या एका वृत्तसंस्थेने पहिल्या महिन्यात 36,721 आणि दुसऱ्या महिन्यात 24,172 वर्तमानपत्रे छापली तर दुसऱ्या महिन्यात त्यांनी किती वर्तमानपत्रे कमी छापली ती संख्या सहस्त्र स्थानापर्यंत अंदाजे काढा . (कठीण)

40. एक रेल्वेगाडी 225 किलोमीटर/तास वेगाने धावत असल्यास एका दिवसामध्ये त्या रेल्वे गाडीने आक्रमिलेले सहस्त्र स्थानापर्यंतचे अंदाज अंतर काढा. (कठीण)

41. एका सुताराला नोव्हेंबर महिन्यामध्ये 18,634 रुपये व डिसेंबर महिन्यामध्ये 32,625 रुपये इतकी मजुरी मिळाली. तर डिसेंबर महिन्यात त्याला मिळालेल्या ज्यादा मजुरीची दशसहस्त्र स्थानापर्यंतची अंदाजे संख्या काढा. (कठीण)

## पाठ 14 : दशांश अपूर्णांक

1. दशांशात लिहा - A) 0.5 , B) 0.08. (सुलभ)
2. $\frac{1}{2}$ ही संख्या दशांशात लिहा. (सुलभ)
3. अंकात लिहा.- शून्य बिंदू एक दोन. (सुलभ)
4. 8 मिलीमीटर = _____ सेंटीमीटर. (सुलभ)
5. दशांशात लिहा - 2 रुपये 15 पैसे. (सुलभ)
6. रंगवलेला भाग अपूर्णांकात लिहा.  (सुलभ
7. 15 मीटर 6 सेंटीमीटर = ______मीटर . (सुलभ)
8. $\frac{1}{6}$ आणि $\frac{1}{8}$ या अपूर्णांकातील अंश आणि छेद ओळखा. (सुलभ)
9. चित्राच्या सहाय्याने अपूर्णांक दर्शवा. - a) $\frac{2}{4}$. b) $\frac{3}{5}$. (कठीण)
10. दशांश आणि रुपयाचे चिन्ह दाखवा. (साधारण)
11. तुझे आणि तुझ्या मित्राचे वजन दशांशामध्ये लिही. (साधारण)

12. दशांश कोष्टकाचे चित्र दाखवा. (साधारण)

13. दशांश आणि अपूर्णांक असे वर्गीकरण करा. (साधारण)

$0.2,\ 0.5,\ \frac{1}{4},\ 0.6,\ 0.7,\ \frac{2}{5},\ \frac{3}{4},\ \frac{6}{8}.$


14. मोजपट्टीचे चित्र काढून त्यावर खालील संख्या दर्शवा . (साधारण)

0.4, 1.5, 2.5, 4.3, 3.2.

15. खालील संख्या स्थानमूल्य तक्त्यात दर्शवा. (कठीण)

A) 263.5, B) 345.24

16. खालील चित्र दशांश संख्येत दर्शवा. (सुलभ)



17 . $\frac{1}{2}$ चा एक समान अपूर्णांक लिहा. (साधारण)

18. दशांशात लिहा. A) 20 रुपये 25 पैसे B) 65 पैसे. (साधारण)

19. $\frac{2}{5}$ चे दशांशात रूपांतर करा. (सुलभ)

20. दशांश अपूर्णांक म्हणजे काय ? एक उदाहरण द्या. (सुलभ)

21. 108.06 हे अक्षरात लिहा. (सुलभ)

22. $\frac{1}{4}$ हा अपूर्णांक चित्रात दाखवा. (कठीण)

23. $\frac{6}{2}$ अपूर्णांक 100 छेद घेऊन लिहा. (कठीण)

24. खालील अपूर्णांक दशांशात लिहा. (साधारण)

$\frac{2}{10}, \frac{3}{10}, \frac{12}{10}, \frac{15}{10}.$

********************************

## पाठ 15 : आर्थिक व्यवहार

1. एक रुपये =_____ पैसे. (सुलभ)

2. 20 रुपये 15 पैसे दशांशात लिहिल्यास_______. (साधारण)

3. 12.40 रुपये + 6.20 रुपये =______. (सुलभ)

4. 5.20 रुपये - 2.10 रुपये =_____. (सुलभ)

5. 26.10 रुपये × 2 =_____ (सुलभ)

6. 120 रुपये ÷ 4 =______. (सुलभ)

7. खरेदी केलेल्या वस्तूंची यादी आणि दर लिहिलेल्या चिठ्ठीला ______ म्हणतात. (सुलभ)

8. एका पेन्सिलची किंमत 6 रुपये असल्यास एक डझन पेन्सिलिंची किंमत_______. (साधारण)

9. 12 चॉकलेटस् ची किंमत 96 रुपये असल्यास एका चॉकलेटची किंमत______. (साधारण)

10. 325 पैसे रुपयांमध्ये लिहिल्यास________. (साधारण)

11. 42 रुपये पैशांमध्ये लिहिल्यास_______. (साधारण)

12. माझ्याकडे 15 रुपये असताना मी त्यातील 7 रुपये मित्राला दिल्यास माझ्याकडे शिल्लक राहिलेले पैसे________ (कठीण)

13. हरीने 15. 20 रुपयांना एक पुस्तक , 22. 25 रुपयांना एक कंपास , 5. 20 रुपयांना एक पेन्सिल खरेदी केल्यास त्याने खरेदी केलेल्या वस्तूंची एकूण किंमत किती ? (कठीण)

14. शीलाला 38. 20 रुपयांचा एक चेंडू खरेदी करायचा आहे. परंतु तिच्याकडे फक्त 24 रुपये आहेत; तर चेंडू खरेदी करण्यासाठी तिला आणखी किती रुपयांची आवश्यकता आहे? (कठीण)

15. एका पिशवीची किंमत 15.20 रुपये असल्यास अशा 6 पिशव्यांची किंमत किती ? (साधारण)

16. सहा बाहुल्यांची किंमत 252 रुपये असल्यास एका बाहुलीची किंमत किती ? (साधारण)

17. पावती म्हणजे काय ? (सुलभ)

18. पावतीमध्ये कोणकोणत्या गोष्टींचा उल्लेख असतो ? (सुलभ)

19. रुपये 600 मधून 328. 20 वजा करा. (साधारण)

20. एक किलो साखरेची किंमत 55.50 रुपये असल्यास चार किलो साखरेची किंमत किती ? (साधारण)

21. विनोद मोलमजुरी करून सात दिवसांमध्ये 9436 रुपये कमावतो. तर त्याचे एका दिवसाचे उत्पन्न किती ? (साधारण)

22. साखर 20 रुपये किलो, तांदूळ 45 रुपये किलो, गहू 65 रुपये, तेल 55 रुपये तर द्यावी लागणारी एकूण रक्कम पावती तयार करून दाखवा ? (कठीण)

23. सरिताजवळ 4625 रुपये होते .त्यातील तिने 2675 रुपयेचा एक ड्रेस खरेदी केला. तर तिच्याकडे शिल्लक असलेले पैसे किती ? (कठीण)

24. रमेशने ज्योती जनरल स्टोअर्स मधून 12.05. 2025 रोजी खालील वस्तू खरेदी केल्या. (कठीण)

A) तांदूळ 30 रुपये / किलो प्रमाणे 4 किलो ब) गहू 25 रुपये / किलो प्रमाणे 6 किलो .

C) साखर 45 रुपये / किलो प्रमाणे 8 किलो D) जोंधळा 30 रुपये / किलो प्रमाणे 25 किलो

तर पावती तयार करून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1. साखरेचे किंमत ______. 2.ग्राहकाचे नाव ________

3.दुकानदाराचे नाव _____. 4.पावतीवरील एकूण रक्कम______.

**********************************

## पाठ 16 : वजन आणि घनफळ

I .रिकाम्या जागा भरा.

1. वस्तूंचे वजन अचूकपणे मोजण्यासाठी असलेल्या आदर्श मोजमापाला______ असे म्हणतात. (सुलभ)

2. एक किलोग्रॅम =_____ ग्रॅम (सुलभ)

3. अर्धा किलोग्रॅम =______ग्रॅम (सुलभ)

4. पाऊण किलोग्राम =______ग्रॅम. (सुलभ)

5. पाव किलोग्रॅम =_______ग्रॅम. (सुलभ)

6. एक क्विंटल =______ग्रॅम. (सुलभ)

7. एक टन =______ग्रॅम. (सुलभ)

8. किलोग्रॅमचे ग्रॅममध्ये रूपांतर करण्यासाठी किलोग्रॅमला _____ने गुणावे लागेल. (सुलभ)

9. डेकाग्रॅमचे ग्रॅममध्ये रूपांतर करण्यासाठी डेकाग्रॅमला _____ने गुणावे लागेल. (सुलभ)

10. हेक्टोग्रमचे ग्रॅममध्ये रूपांतर करण्यासाठी हेक्टोग्रामला _____ने गुणावे लागेल. (सुलभ)

11. ग्रॅमचे किलोग्रॅममध्ये रूपांतर करण्यासाठी ग्रॅमला _____ने भागावे लागेल. (सुलभ)

12. मिलीग्रॅमचे ग्रॅममध्ये रूपांतर करण्यासाठी मिलीग्रॅमला _____ने भागावे लागेल. (सुलभ)

13. किलोग्रॅमचे क्विंटलमध्ये रूपांतर करण्यासाठी किलोग्रॅमला _____ने भागावे लागेल. (सुलभ)

14. 8 किलोग्राम =______ग्रॅम . (सुलभ)

15. 15 किलोग्राम =_____ मिलिग्रॅम . (सुलभ)

16. 7000 ग्रॅम =______किलोग्रॅम . (सुलभ)

17. 12 क्विंटल =______ किलोग्रॅम . (सुलभ)

18. 950 मिलीग्राम =______ ग्रॅम . (सुलभ)

19. 1500 किलोग्राम =______क्विंटल . (सुलभ)

20. 1000 मिलिग्रॅम =______ ग्रॅम. (सुलभ)

21. द्रवपदार्थ मोजण्यासाठी वापरण्यात येणारे परिमाण_______. (सुलभ)

22. एक लिटर = …………मिलिलिटर . (सुलभ)

23. $\frac{1}{2}$ लिटर =______ मिलिलिटर. (सुलभ)

24. $\frac{1}{4}$ लिटर = ………मिलिलीटर. (सुलभ)

25. 1 किलो लिटर =_____ लिटर. (सुलभ)

26. आकारमानाच्या मोठ्या परिमाणाचे लहान परिमाणात रूपांतर करताना ______ला गुणायला हवे. (सुलभ)

27. किलोलीटरचे लिटर मध्ये रूपांतर करत असताना_______ला गुणायला हवे. (सुलभ)

28. हेक्टोलिटरचे लिटर मध्ये रूपांतर करताना______ला गुणायला हवे. (सुलभ)

29. डेकालिटरचे लिटर मध्ये रूपांतर करताना______ला गुणायला हवे. (सुलभ)

30. लिटरचे किलोलिटर मध्ये रूपांतर करताना _____ला भागायला हवे. (सुलभ)

31. लिटरचे हेक्टोलिटर मध्ये परिवर्तन करताना_______ला भागायला हवे. (सुलभ)

32. मिलिलिटरचे लिटरमध्ये रूपांतर करताना ______ला भागायला हवे. (सुलभ)

33. 6 लिटर=_______ मिलिलीटर. (सुलभ)

34. पाच किलोलिटर=______ लिटर. (सुलभ)

35. 500 मिलिलिटर=_______ लिटर. (सुलभ)

36. 7000 लिटर=_______ किलोलिटर. (सुलभ)

II) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. ( प्रत्येकी दोन गुण)

37. जास्त वजन असणाऱ्या वस्तूंचे वजन मोजण्यासाठी वापरण्यात येणारे आदर्श परिमाण कोणते ? (सुलभ)

38. कमी वजन असणाऱ्या वस्तूंचे वजन मोजण्यासाठी वापरण्यात येणारे परिमाण कोणते ? (सुलभ)

39. 3 किलो ग्रॅम वजन म्हणजे किती ग्रॅम ? (सुलभ)

40. चार हेक्टोग्राम वजन बरोबर किती ग्रॅम ? (सुलभ)

41. पंधरा डेका ग्रॅम बरोबर किती ग्रॅम ? (सुलभ)

42. पाच क्विंटल बरोबर किती किलो ग्रॅम ? (सुलभ)

43. 500 मिलिग्रॅम बरोबर किती ग्रॅम ? (सुलभ)

44. 1400 सेंटी ग्रॅम वजन बरोबर किती ग्रॅम ? (साधारण)

45. 280 डेसीग्रॅम बरोबर किती ग्रॅम ? (साधारण)

46. 750 ग्रॅम बरोबर किती किलोग्राम? (साधारण)

47. 850 किलोग्रॅम बरोबर किती क्विंटल? (कठीण)

III) बेरीज करा

48. 4 किलोग्रॅम 250 ग्रॅम आणि 12 किलोग्रॅम 355 ग्रॅम. (साधारण)

49. 24 किलोग्रॅम 432 ग्रॅम आणि 37 किलो ग्रॅम.350 ग्रॅम. (साधारण)

50. 13 किलोग्रॅम 450 ग्रॅम आणि 14 किलोग्रॅम 550 ग्रॅम . (साधारण)

51. 7 किलोग्रॅम 370 ग्रॅम, 8 किलोग्रॅम 430 ग्रॅम ,7 किलोग्राम 220 ग्रॅम आणि 430 ग्रॅम. (कठीण)

IV ) वजाबाकी करा

52. 28 किलो 550 ग्रॅम मधून 13 किलो 250 ग्रॅम. (साधारण)

53. 70 किलो 675 ग्रॅम मधून 35 किलो 550 ग्रॅम . (साधारण)

54. 85 किलो 730 ग्रॅम मधून 55 किलो 335 ग्रॅम . (साधारण)

55. 75 किलो 475 ग्रॅम मधून 34 किलो 585 ग्रॅम . (साधारण)

56. 40 किलो 360 ग्रॅम मधून 25 किलो 200 ग्रॅम. (साधारण)

V) खालील उदाहरणे सोडवा

57. मोठ्या प्रमाणातील द्रव पदार्थ मोजण्यासाठी वापरण्यात येणारे एकक________. (साधारण)

58. कमी प्रमाणातील द्रव पदार्थ मोजण्यासाठी वापरण्यात येणारे एकक ______. (साधारण)

59. लिटरचे किलोलिटरमध्ये रूपांतर करताना काय करायला हवे ? (कठीण)

VI) रूपांतर करा .

60. 4 किलोलीटर द्रवाचे लिटरमध्ये . (साधारण)

61. पाच हेक्टोलिटरचे लिटरमध्ये . (साधारण)

62. 17 डेका लिटरचे लिटर मध्ये . (साधारण)

63. 7000 लिटरचे किलोलिटर मध्ये. (साधारण)

64. 1200 लिटरचे हेक्टोलिटर मध्ये . (साधारण)

65. 900 लिटरचे डेका लिटर मध्ये. (साधारण)

66. 15,000 मिलिलीटरचे लिटर मध्ये. (साधारण)

VII) बेरीज करा.

67. 3 लिटर 250 मिली लिटर, 750 मिली लिटर, आणि 6 लिटर 500 मिलिमीटर . (साधारण)

68. 15 लिटर 450 मिलीलिटर ,5 लिटर 350 मिली लिटर आणि 21 लिटर 750 मिलीलिटर . (साधारण)

69. 12 लिटर 550 मिलिमीटर, 14 लिटर 450 मिली लिटर आणि 12 लिटर 750 मिलिलिटर. (साधारण)

70. 18 लिटर 500 मिलिलीटर आणि 6 लिटर 750 मिली लिटर. (साधारण)

71. 14 लिटर 250 मिलिलिटर आणि 16 लिटर 450 मिलीलिटर. (साधारण)

VIII ) वजाबाकी करा.

72. 25 लिटर 350 लिटर मधून 15 लिटर 750 मिलिलिटर . (साधारण)

73. 64 लिटर 450 मिलीलिटर मधून 24 लिटर 550 मिलीलिटर. (साधारण)

74. 75 लिटर 750 मिलिलिटर मधून 45 लिटर 800 मिलिलिटर . (साधारण)

75. 55 किलोलिटर मधून 34 किलोलिटर 750 लिटर. (साधारण)

IX ) खालील उदाहरणे सोडवा.

76. सुजलने दुकानातून 16 किलो ग्रॅम गुळ आणि 15 किलोग्रॅम तांदूळ खरेदी केले. त्या दोन्ही वस्तू तिने एकाच पोत्यात भरले. तर त्या पोत्याचे वजन किती? (कठीण)

77. एका शाळेच्या कोठारात अक्षर दासोह योजनेसाठी आणलेला 82 किलो तांदूळ आहे. त्यातील 16 किलो तांदूळ जेवणासाठी वापरल्यास शिल्लक तांदूळ किती ? (कठीण)

78. एका पोत्यात 20 किलोग्रॅम रवा भरलेला आहे. तर 140 किलोग्रॅम रव्यासाठी किती पिशव्या लागतील ? (कठीण)

79. एका रेशन दुकानात एका व्यक्तीला बारा किलोग्रॅम तांदूळ देतात . रामायाच्या कुटुंबात चार सदस्य आहेत. तर त्यांच्या कुटुंबाला मिळणाऱ्या तांदळाचे एकूण वजन किती? (कठीण)

80. काळप्पा ,चन्नप्पा, तीमप्पा, भोमय्या या चार लोकांनी समान रक्कम घालून 50 किलोग्रॅम वजनाचा एक पोते सूर्यफुलाच्या बिया आणल्या. या चार व्यक्तींनी समानरीतीने त्याची वाटणी केल्यास प्रत्येकाला मिळणाऱ्या तेलबियांचे वजन किती ? (कठीण).

81. 18 किलोग्रॅम साखर चार पिशवीतून समानपणे भरलेली आहे .तर एका पिशवीतील साखरेचे वजन किती ? ( कठीण)

82. एका शेतकऱ्याने त्याच्या एका शेतामध्ये 60 किलोग्रॅम 400 ग्राम कांद्याचे उत्पादन घेतले आणि दुसऱ्या शेतामध्ये 56 किलोग्रॅम कांद्याचे उत्पादन घेतले. त्यातील 98 किलोग्रॅम 200 ग्रॅम कांदा त्याने विकला .तर शिल्लक कांद्याचे वजन किती ? (कठीण)

83. तुझ्या वडिलांनी कामावरून घरी परत येताना 3 लिटर 250 मिलिलिटर शेंगा तेल आणले. त्याच दिवशी आईने सुद्धा 1लिटर 500 मिलिलिटर शेंगा तेल आणले. तर त्या दोघांनी आणलेल्या शेंगातेलाचे वजन किती ? (कठीण)

84. एका दूध विक्रेत्याकडे 25 लिटर दूध आहे .त्यातील त्याने 16 लिटर 750 मिलिमीटर दूध विकले. तर त्याच्याकडे शिल्लक दूध किती ?

( कठीण )

85. एका बाटलीत 1 लिटर 500 मिली लिटर सुगंधी द्रव्य आहे. हे सुगंधी द्रव्य 250 ml च्या लहान लहान बाटलीमध्ये समानपणे घालायचे झाल्यास किती लहान बाटल्या लागतील ? (कठीण)

86. एका तांब्या 300 मिलिलिटर पाणी आहे. तर दुसऱ्या तांब्यात 250 मिलिलिटर पाणी आहे. हे दोन्ही तांबे एका लहान भांड्यात ओतल्यास त्या भांड्यातील पाण्याचे प्रमाण किती ? (कठीण)

87. एका खाद्यतेलाच्या डब्यात 15 लिटर खाद्यतेल आहे. त्यातील पहिल्या महिन्यात राणीने 3 लिटर 600 मिलिलीटर आणि दुसऱ्या महिन्यात 5 लिटर 300 मिलिलिटर खाद्यतेल वापरले .तर डब्यामध्ये शिल्लक तेलाचे प्रमाण किती ? (कठीण)

88. एका बाटलीत 200 मिलिलीटर दूध भरलेले आहे. अशाच प्रकारच्या पाच बाटलीमध्ये एकूण किती दूध भरेल ? (कठीण)

89. एका भांड्यात 1 लिटर 800 मिलिमीटर चहा आहे .तो चहा एकाच मापाच्या बारा वाटीमध्ये समानपणे वाटण्यात आला .तर प्रत्येक वाटीतील चहा किती ? (कठीण)

90. एक व्यक्ती एका दिवसात 2 लिटर 300 मिलिमीटर पाणी पितो .तर दहा दिवसात त्या व्यक्तीने पिलेल्या पाण्याचे प्रमाण किती ? (कठीण)

91. आठ तांबे पाणी घालून एक भांडे भरले आहे. त्या भांड्यात 5 लिटर 600 मिलिमीटर पाणी असल्यास प्रत्येक तांब्याचे माप किती ? (कठीण)

92. 100 मिलिलीटर उसाचा रस चार मित्रांमध्ये समान रीतीने वाटल्यास प्रत्येकाला मिळणाऱ्या रसाचे प्रमाण किती ? (कठीण)

## पाठ 17 : वेळ

I) ( प्रत्येकी 1 गुण )

1. सकाळचे 10:15 वा. हे am किंवा pm मध्ये लिहा. (सुलभ)

2. 5:35 PM हे am किंवा pm मध्ये लिहा. (सामान्य)

3. 23:25 याला 12 तासाच्या घड्याळात रूपांतरित करा आणि ते am किंवा pm मध्ये लिहा. (सुलभ)

4. 6:30 PM हे 24 तासांच्या घड्याळात रूपांतरित करा आणि ते am किंवा pm मध्ये लिहा. (सुलभ)

5. सकाळी 8:30 वाजता हे 24 तासांच्या घड्याळात रूपांतरित करून ते am/pm मध्ये लिहा. (सुलभ)

6. एका मिनिटात किती सेकंद असतात ? (सुलभ)

7. एका तासात किती मिनिटे असतात ? (सुलभ)

8. फेब्रुवारीमध्ये किती दिवस असतात ? (सुलभ)

9. सकाळी 7 ते दुपारी 2 पर्यंत किती तास असतात ? (सामान्य)

10. 1 तास 15 मिनिटांची किती मिनिटे असतात ? (सुलभ)

11. 90 मिनिटे म्हणजे किती तास आणि मिनिटे ? (सामान्य)

12. वेळ दाखवणारे उपकरण कोणते आहे? (सामान्य)

13. एका वर्षात किती दिवस ? (सामान्य)

14. लीप वर्ष म्हणजे काय ? (सुलभ)

15. घड्याळाचा मोठा काटा कोणती वेळ दाखवतो ? (सुलभ)

16. एका दिवसात किती मिनिटे असतात ? (सामान्य)

17. घड्याळाचा छोटा काटा काय दाखवतो ? (सुलभ)

18. एका दिवसाचे तास किती आहेत ? (सामान्य)

19. 2004 हे लीप वर्ष आहे का ? (सामान्य)

20. 2010 हे लीप वर्ष आहे की सामान्य वर्ष आहे ? (सामान्य)

II) दोन गुणांचे प्रश्न

21. 4 तास 40 मिनिटे आणि 6 तास 30 मिनिटे यांची बेरीज किती आहे ? (सामान्य)

22. पाच वर्षे सहा महिने आणि चार वर्षे नऊ महिने मिळवून बेरीज करा. (सामान्य)

23. 3 तास 15 मिनिटे 18 सेकंद आणि 1 तास 19 मिनिटे 17 सेकंदांची बेरीज किती आहे ? (सामान्य)

24. सकाळी 7 तास 30 मिनिटातून, 5 तास 10 मिनिटे वजा करा. (सामान्य)

25. 7 वर्षे 5 महिन्यांमधून 4 वर्षे 11 महिने वजा करा. (सामान्य)

26. एका दिवसात किती तास, मिनिटे आणि सेकंद असतात ते स्पष्ट करा. (सामान्य)

27. मुलांचा एक गट सकाळी 6 वाजता घराबाहेर पडला आणि दुपारी 12 वाजता त्यांच्या स्थानी पोहोचला. तर गटाला किती वेळ लागला? (कठीण)

28. 1 तास 40 मिनिटे फक्त सेकंदात मोजा. (कठीण)

29. जर खेळ 10.20 वाजता सुरू झाला आणि 12.50 वाजता संपला, तर खेळाचा कालावधी किती ? (कठीण)

30. श्याम सकाळी 9:00 वाजता ऑफिसला येतो आणि 8 तास ऑफिसमध्ये काम करतो. तर तो संध्याकाळी किती वाजता ऑफिसमधून निघतो (कठीण)

31. 3 ऑक्टोबर रोजी अर्धवार्षिक सुट्टीसाठी बंद असलेली शाळा 31 ऑक्टोबर रोजी पुन्हा सुरू झाली. अर्धवार्षिक सुट्टीचे दिवस किती ? (कठीण)

32. फातिमा शाळेत 5 तास 10 मिनिटे आणि घरी 2 तास 50 मिनिटे अभ्यास / सराव करते. तर त्या एका दिवसात तिने किती वेळ सराव केला ? (कठीण)

33. महेश दिनांक 03/10/2024 पासून त्याची 15 दिवसांची सुट्टी त्याच्या काकांच्या घरी घालवतो. तर तो कोणत्या तारखेला त्याच्या काकांच्या घरातून निघेल ? (कठीण)

III) चार गुणांचे प्रश्न

34. वेळेचे निरीक्षण करा आणि खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (कठीण)

| वेळ | कृती |
|---|---|
| 6am | उठणे |
| 6:30am | व्यायाम |
| 7am | आंघोळ |
| 7:30am | नाश्ता |
| 8am | शाळेला जाणे |

अ. तुम्ही उठल्यापासून शाळेत जाईपर्यंत किती वेळ लागतो?

आ. तिने व्यायाम किती वेळ केला?

इ. तिला आंघोळ आणि नाश्ता करायला किती वेळ लागला?

ई. या सर्व क्रिया पूर्ण होण्यासाठी किती वेळ लागला?

35. खालील घड्याळाकडे पहा आणि प्रश्नांची उत्तरे द्या. (कठीण)



अ. घड्याळ किती वेळ दाखवत आहे ?

आ. आणखी 1 तास 45 मिनिटे वजा केली तर किती वाजले असतील ?

इ. दुपारी 12 वाजल्यापासून या वेळेपर्यंत किती तास झाले ?

ई. त्या दिवशी तू यावेळी कुठे होतास ?

36. घड्याळात 6 तास 45 मिनिटे दर्शवा. (कठीण)


*******************************

## पाठ 18 : सममितीय आकृत्या


I) खालील चित्रांमधील सममितीय आकृती ओळखा आणि वरून खालीपर्यंत सममिती अक्ष काढा. (सुलभ) 5 x1 = 5





II) खालील चित्रांमधील सममितीय आकृती ओळखा आणि डावीकडून उजवीकडे सममिती अक्ष काढा. (सुलभ) 5 x1 = 5





III) खालील चित्रांमध्ये सममितीय आकृत्या ओळखून चित्रांखाली ☐ त चिन्हांकित ✓ करा. (सुलभ) 5 x 1 = 5

11) 


12) 


13) 


14) 


15) 


IV) खालील चित्रांमध्ये, सममितीय नसलेल्या आकारांना चित्रांखाली ☐ त X चिन्हांकित करा. (सुलभ) 5 x 1 = 5

16) 


17) 

18) 

19) 

20) 

V) रिकाम्या जागी भरा. (सामान्य) 8 x 1 = 8

21)  या सममितीय आकृतीतील सममितीच्या अक्षांची संख्या ____________

22)  या आकृतीमध्ये सममितीच्या अक्षांची संख्या ____________


23)  ही प्रतिमा आरशासमोर धरता तेव्हा निर्माण होणाऱ्या प्रतिमेचे प्रतिबिंब ____________

24)  ही प्रतिमा आरशासमोर धरल्यावर तयार होणाऱ्या प्रतिबिंब प्रतिमा ____________


25) जेव्हा आयताकृती कागदाचा तुकडा अर्ध्यामध्ये दुमडला जातो तेव्हा एक आकार कापला जातो आणि परिणामी आकार दुसऱ्या आकारा____________असतो.


26) ही एक सममितीय आकृती आहे आणि तिला ................सममिती अक्ष आहेत. 


27) सममितीय नसलेल्या आकृत्यांना ……………. काढता येत नाही.

28)  चे प्रतिबिंब चित्र काढल्यावर तयार होणारी प्रतिमा.........

VI ) खालील चित्रातील गटात समाविष्ट नाही असे चित्र चिन्हांकित ✓ करा . (सामान्य) 4 x 1 = 4

29) 


30) 

31) 


32) 

VII) खाली काही सममितीय आकृत्यांचे अर्धे भाग दिले आहेत. दुसरा अर्धा भाग काढून ते पूर्ण करा. (सामान्य) 6 x 2 = 12

33) 34) 35) 36) 37) 38)



VIII) खालील प्रश्नांची उत्तरे द्या. 1 x 2 = 2

39) इंग्रजीतील कोणत्या मोठ्या (CAPITAL)अक्षरांना ½ वळण दिल्यावर आकार बदलत नाही याची यादी करा. (सामान्य)

40) इंग्रजीतील कोणते मोठे अक्षर ¼ बाजूने फिरवल्यावर दुसरे अक्षर बनते ? एक चित्र काढा. (सामान्य)

41) ½ गोल फिरवील्यानंतर, आकृत्या पूर्वीसारख्याच दिसतात. अशा आकृत्या काढा. (सामान्य)

42) ¼ फिरवल्यानंतर पूर्वी सारख्या दिसणाऱ्या आकारांचे चित्र काढा. (सामान्य)

43) 1/3 फिरवल्यानंतर पूर्वीसारखेच दिसणारे आकारांचे चित्र काढा. (कठीण)

IX) 1 x 2 = 2

44) एक मुलगा बोर्डासमोर उभा राहून त्याकडे पाहतो. 6666 (कठीण)



दुसरा मुलगा त्याच बोर्डाकडे शीर्षासन करत पाहतो.

तर दोघांनी बोर्ड कसा वाचला ते स्पष्ट करा.

X) तुमच्या आजूबाजूला पाहिलेल्या 8 सममितीय आकृत्यांची यादी करा. 1 x 3 = 3 (कठीण)

45) 1)

2)

3)

4)

5)

6)

7)

8)

XI) तुमच्या आजूबाजूला पाहिलेल्या 8 असममित / सममिती नसलेल्या आकृत्यांची यादी करा. (कठीण) 1 x 3 = 3

46) 1)

2)

3)

4)

5)


6)

7)

8)

XII) कार्डबोर्डवर एक आयत, एक काटकोन, एक त्रिकोण आणि 4 वर्तुळे कापून त्यांना चित्रात दाखवल्याप्रमाणे काठ्या जोडा. काठी तुमच्या तळहातांमध्ये ठेवा आणि काठी जोरात फिरवल्यावर तयार होणारे घन आकार काढा आणि त्यांची नावे द्या. 1 x 3 = 3 (सामान्य )


47)




48)




49)



XIII) खालील तक्त्यामध्ये, वर काही चित्रे दिली आहेत. उजव्या बाजूला, चित्र किती प्रमाणात फिरवता येते ते दिले आहे. जर त्या प्रमाणात फिरवल्यावर चित्र पूर्वीसारखेच दिसत असेल तर ✓ चिन्हाने दर्शवा आणि जर ते पूर्वीसारखे दिसत नसेल तर X ने दर्शवा. (कठीण) 1 x 4 = 4

50)

| फेरी |  |  |  |  |  |  | W | 8 |  |  |  |  |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| $\frac{1}{2}$ फेरी | ✓ | | | | | | | | | | | |
| $\frac{1}{3}$ फेरी | x | | | | | | | | | | | |
| $\frac{1}{4}$ फेरी | ✓ | | | | | | | | | | | |
| $\frac{1}{6}$ फेरी | x | | | | | | | | | | | |

*************************************

## पाठ 19 : त्रिमितीय आकृत्या

I) 1 गुणांचे बहुपर्यायी प्रश्न

1.  या वस्तूसारखे दिसणाऱ्या त्रिमितीय आकृतीचे नाव - (सुलभ )

A) घनायत, B) वृत्तचिती C) घन D) शंकू

2.  या वस्तूसारखे दिसणारे त्रिमितीय आकृतीचे नाव (सुलभ)

A) घनायत B) शंकू C) वृत्तचिती D) घन

3.  घन वस्तूसारखे दिसणारे त्रिमितीय आकृतीचे नाव (सुलभ)

A) शंकू B) घनायत C) घन D) वृत्तचिती

4 .  या वस्तूसारखे दिसणाऱ्या त्रिमितीय आकृतीचे नाव (सुलभ)

A) घनायत B) वृत्तचिती C) शंकू D) घन

5. घनाचे पृष्ठभाग या आकाराचे असतात. (सुलभ)

A) आयत B) चौरस C) त्रिकोण D) वर्तुळ

II) 1 गुणांचे प्रश्न

6. घनाच्या पृष्ठभागांची संख्या……………… (सुलभ)

7. घनायतच्या पृष्ठभागांची संख्या…………… (सुलभ)

8. वृत्तचितीच्या पृष्ठांची संख्या आहे…………. (सुलभ)

9. शंकूच्या पृष्ठभागांची संख्या………….. (सुलभ)

10. घनाला ……………कडा असतात (सुलभ)

11. घनायताला ………..कडा असतात. (सुलभ)

12. शंकूला ………..कडा असतात. (सुलभ)

13. वृत्तचितीला ……… कडा असतात. (सुलभ)

14. घनाच्या शिरोबिंदूंची संख्या……… आहे. (सुलभ)

15. घनायताला ……..शिरोबिंदू असतात. (सुलभ)

16. वृत्तचितीच्या शिरोबिंदूंची संख्या…….. आहे. (सुलभ)

17. शंकूच्या शिरोबिंदूंची संख्या………. आहे. (सुलभ)


18. वृत्तचितीच्या वर्तुळाकार पृष्ठभागांची संख्या……… (सुलभ)

19. शंकूच्या वर्तुळाकार पृष्ठभागांची संख्या…….. (सुलभ)

20. घनाकृतींच्या चित्रामध्ये दिसणाऱ्या कडांना……… रेषेने दर्शवितात. (सुलभ)

21. घनाकृतींच्या चित्रामध्ये न दिसणाऱ्या कडांना……… रेषेने दर्शवितात. (सुलभ)

II) 1 गुणांचे प्रश्न जोड्या जुळवा. (सामान्य )

| ' अ 'यादी | 'ब' यादी |
|---|---|
| 22  |  |


23 

24 


25 

V) दिलेल्या घनाकृतीशी जुळणाऱ्या चित्राशेजारी योग्य ✓ चिन्ह आणि न जुळणाऱ्या चित्राशेजारी चुकीचे x चिन्ह ठेवा.


26 . घन





27. वृत्तचिती




28 . घनायत




29 . शंकू




V ) 2 गुणांचे प्रश्न

30. घनायताची चार उदाहरणे द्या/सांगा. (सुलभ)

31. घनांची चार उदाहरणे द्या/सांगा.. (सुलभ)

32. वृत्तचितीची चार उदाहरणे द्या/सांगा.. (सुलभ)

33. शंकूची चार उदाहरणे द्या/सांगा. (सुलभ)

34. शंकू मधील समतल आणि वक्र पृष्ठभागांची संख्या सांगा. (सामान्य )

35. वृत्तचितीतील समतल आणि वक्राकार पृष्ठभागांची संख्या सांगा. (सामान्य )

36. वेगवेगळ्या घनाकृती वापरून तयार केलेला रोबोटचे चित्र दिलेले आहे. त्यातील त्रिमितीय आकार ओळखा आणि त्यांची नावे द्या आणि प्रत्येक आकार किती वेळा वापरला आहे ते लिहा. (कठीण)



VI ) 3 गुणांचे प्रश्न

37. एका घनाकृतीला किती दिशानी/दृश्यांनी पाहू शकतात ? ती कोणकोणती ? (कठीण)


38. घनाचे समोरील दृश्य, बाजूचे दृश्य आणि वरच्या दृश्याचे 2D / द्विमितीय रेखाचित्र काढा. (कठीण)

39. घनायताचे समोरील दृश्य, बाजूचे दृश्य आणि वरच्या दृश्याचे 2D / द्विमितीय रेखाचित्र काढा. (कठीण)

40. वृत्तचितीचे समोरील दृश्य, बाजूचे दृश्य आणि वरच्या दृश्याचे 2D / द्विमितीय रेखाचित्र काढा. (कठीण)

41. शंकूचे समोरील दृश्य, बाजूचे दृश्य आणि वरच्या दृश्याचे 2D / द्विमितीय रेखाचित्र काढा. (कठीण)

42. दिलेल्या जिन्याच्या चित्रात, समोरचा, बाजूचा आणि वरचा भाग काढा. (कठीण)





VII ) 4 गुणांचे प्रश्न

43. घनायत, घन, वृत्तचिती आणि शंकुचे चित्र काढा. (सामान्य)

44.घनायत, घन, वृत्तचिती आणि शंकू यांचे गुणधर्म सांगा. (सामान्य)

45.दिलेल्या जालाकृतीपासून त्रिमितीय आकृती तयार करा. (सामान्य)



## पाठ 20 : आकृतीबंध

I ) एक गुणांचे प्रश्न

- खालील संख्यांचा आकृतीबंध नमुना पहा आणि त्यापुढील दोन संख्या लिहा. (सुलभ)

1. 1, 3, 5, 7 ___, ___

2. 5, 10, 15, 20 ___, ___

3. 13, 15, 18, 20, 23, ___, ___

4. 21, 20, 19, 18, ___, ___

5. 35, 30, 25, 20, ___, ___

II) दोन गुणांचे प्रश्न (सुलभ)

6) त्रिकोणी संख्या श्रेणीची/मालिकेची सुरुवात खाली दिली आहे. रिकाम्या जागा भरा.

1, 3, 6, 10, _______ ,______, ________, 36, 45,

7) वर्ग संख्यांच्या श्रेणीची / मालिकेची सुरुवात खाली दिली आहे. रिकाम्या जागा भरा.

1, 4, 9, 16, ______, _______, ______, 64, 81

IV) 3 गुणांचे प्रश्न

8) पहिल्या चार त्रिकोणी संख्या लिहा, त्यांना ठिपकेदार रेषेने दर्शवा. (सामान्य)

9) पहिल्या चार वर्ग संख्या लिहा. त्यांना ठिपकेदार रेषेने दर्शवा. (सामान्य)

10) खाली दिलेल्या संख्याच्या नमुन्यांचे निरीक्षण करा आणि रिकाम्या जागा भरा. (सामान्य)

$1 + 2 + 1 = 4$

$1 + 2 + 3 + 2 + 1 = 9$


$1 + 2 + 3 + 4 + 3 + 2 + 1 = 16$

______________ = ____

______________ = ____

______________ = ____

11. खाली दिलेल्या कडांची रचना पूर्ण करा (सामान्य)





12. खालील तक्त्याचे निरीक्षण करून त्रिकोणी संख्यांभोवती गोल आणि वर्ग संख्यांभोवती चौकोन करा आणि त्यांना त्या संख्या पुढील संबंधित रकान्यात लिहा. (कठीण)

| 7 चा पाढा | त्रिकोणी संख्या | वर्ग संख्या |
|---|---|---|
| 7 x 1 = 7 | | |
| 7 x 2 = 14 | | |
| 7 x 3 = 21 | | |
| 7 x 4 = 28 | | |
| 7 x 5 = 35 | | |
| 7 x 6 = 42 | | |
| 7 x 7 = 49 | | |
| | | |

| | | |
|---|---|---|
| 7 x 8 = 56 | | |
| 7 x 9 = 63 | | |
| 7 x 10 = 70 | | |

13) रिकाम्या चौकोनी जागेत विषम संख्या लिहा आणि वर्तुळात वर्ग संख्या लिहा. (कठीण)




चार गुणांचे प्रश्न.

14) 1 ते 50 पर्यंतच्या संख्या खालील तक्त्यात लिहा. त्यातील वर्ग संख्येने लाल आणि त्रिकोणी संख्या निळ्या रंगाने रंगवा.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | 50 |

अ. 1 ते 50 पर्यंतच्या वर्ग संख्या लिहा.

आ. 1 ते 50 पर्यंतच्या त्रिकोणी संख्या लिहा.

15) खाली दिलेल्या वर्ग संख्यांना क्रमवार विषम संख्यांच्या बेरीजच्या स्वरूपात व्यक्त करा.

4, 9, 16, 36

## उत्तरपत्रिका

## प्रकरण-1 पाच अंकी संख्या

योग्य उत्तर निवडलेले आहे. (एक गुणांचे प्रश्न )

1. C. 7
2. B. 90000
3. C. 6

4 A. 12,345

5 B. 65478

6 B . =

7 D . 1

रिकाम्या जागा भरा (एका गुणांचे प्रश्न)

8 1 X 10000 + 8 X 1000 + 3 X 100 + 0X 10 + 2 X 1

9 75383

10 पस्तीस हजार चारशे बारा.

11 20,435

12 18,347

जोड्या जुळवा (एक गुणांचे प्रश्न)

| अ | ब |
|---|---|
| 13 61,000 च्या मागची संख्या | 60,999 |
| 14 59.999 च्या पुढची संख्या | 60,000 |
| 15 सर्वात लहान पाच अंकी संख्या | 10000 |
| 16 78,654 मधील 8 या अंकाचे स्थानमुल्य | 8,000 |
| 17 सर्वात मोठी पाच अंकी संख्या | 99999 |

खालील संख्या अंकात लिहा (एक गुणांचे प्रश्न)

18 – 47,048

19 - 13,894

खालील संख्या अक्षरात लिहा (एक गुणांचे प्रश्न)

20 सदुसष्ट र हजार तीनशे चौऱ्यांनो

21 चोवीस हजार सहा

संख्यांची तुलना करा आणि मध्यभागी < , > , = चिन्ह लिहा (एक गुणांचे प्रश्न)

22. 26,852 [ > ] 26,342

23. 35,728 [ = ] 35,728

24.87,875 [ < ] 89,361

दिलेल्या संख्येमधील अधोरेखित अंकाचे स्थानिक किमत व दर्शनी किमत लिहा. (दोन गुणांचे प्रश्न)

25. 8247<u>1</u> याची स्थानिक किमत 1 दर्शनी किमत 1

26 7<u>8</u>947 याची स्थानिक किमत 8000 दर्शनी किमत 8

खालील संख्यांची स्थानिक किमत सारणीत लिहा. (दोन गुणांचे प्रश्न)

27 . 65000


| दहाहजार | हजार | शतक | दशक | सुटे |
|---|---|---|---|---|
| 6 | 5 | 0 | 0 | 0 |

76809


| दहाहजार | हजार | शतक | दशक | सुटे |
|---|---|---|---|---|
| 7 | 6 | 8 | 0 | 9 |

खालील संख्या स्थान मुल्यानुसार अबॅकस वर दाखवा . (दोन गुणांचे प्रश्न)

28 25361



29 36052



दिलेल्या संख्येच्या मागची व पुढील संख्या लिहा. (दोन गुणांचे प्रश्न)

| | मागची संख्या | | पुढील संख्या |
|---|---|---|---|
| 30 | 93784 | 93,785 | 93,786 |
| 31 | 81,376 | 81,377 | 81,378 |
| 32 | 42,784 | 42,785 | 42,786 |

उतरत्या क्रमाने लिहा . (तीन गुणांचे प्रश्न )

33 उतरता क्रम 54,786 43,765 32,654 21,435

34 उतरता क्रम 77,777 70,777 70,770 70,077

चढत्या क्रमाने लिहा. (तीन गुणांचे प्रश्न )

35 चढता क्रम 40,444 44,014 44,044 44,444

36 चढता क्रम 33,148 33,184 33,481 33,814

खालील संख्या विस्तारित स्वरुपात लिहा (तीन गुणांचे प्रश्न)

37 95,361 = 9X10,000 + 5X1,000 + 3X100 +6X10+ 1 X1

38 20,005 = 2X10,000 + 0X1,000 + 0X100 +0X10+ 5 X1

खालील संख्या संक्षिप्त स्वरुपात लिहा (तीन गुणांचे प्रश्न)

39 2X10,000 + 3X1,000 + 0X100 +4X10+ 5 X1

= 20,000+3,000+100+40+5

= 23,045

40 7 X10,000 + 2X1,000 + 3X100 + 5X10+ 4 X1

= 70,000+2,000+300+4

= 72,354

संख्या मालिकेचा नमुना ओळखा आणि पूर्ण करा . (तीन गुणांचे प्रश्न)

41 88,888 78,888 68,888 58,888 48,888

42 23,344 23,444 23,544 23,644 23,744

43 58,600 62,600 66,600 70,600 74,600

सारणीमध्ये चित्राच्या स्वरुपात स्थानमुल्य लिहा(तीन गुणांचे प्रश्न)

44 11,243

| दहाहजार | हजार | शतक | दशक | सुटे |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 2 | 4 | 3 |
| ✡ | ✡ | ✡ ✡ | ✡ ✡ ✡ ✡ | ✡ ✡ ✡ |

45 45,642

| दहाहजार | हजार | शतक | दशक | सुटे |
|---|---|---|---|---|
| 4 | 5 | 6 | 4 | 2 |
| ✡ ✡ ✡ ✡ | ✡ ✡ ✡ ✡ ✡ | ✡ ✡ ✡ ✡ ✡ ✡ | ✡ ✡ ✡ ✡ | ✡ ✡ |

खालील प्रश्न सोडवा. (चार गुणांचे प्रश्न)

46 दीपिकाच्या बागेतील या वर्षातील पिकांची संख्या

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| चढता क्रम : | 20,150 | 36,468 | 44,350 | 86,756 | 96,867 |
| | पेरू | शेवगा | डाळिंब | आंबा | नारळ |


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उतरता क्रम ; | 96,867 | 86,756 | 44,350 | 36,468 | 20,150 |
| | नारळ | आंबा | डाळिंब | शेवगा | पेरू |

47 2024-25 या वर्षात क्रिकेटच्या सामन्यात विविध विद्यार्थ्यांनी काढलेल्या धावा


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| चढता क्रम : | 22,327 | 34,327 | 40,318 | 52 , 327 | 63,457 |
| | गणपती | आयुष | भरत | नागराज | आर्यन |
| उतरता क्रम : | 63,457 | 52,327 | 40,318 | 34,327 | 22,327 |
| | आर्यन | नागराज | भरत | आयुष | गणपती |

48 दिलेल्या पायऱ्यावर संख्या चढत्या आणि उतरत्या क्रमाने लावा

28,769 63,470 11,355 45,220 88,888




49 खालील प्रत्येक चित्राचे काळजीपूर्वक निरीक्षण करा आणि प्रत्येक चित्रातील अंकामधून कमाल आणि किमान संख्या लिहा




| | | | | |
|---|---|---|---|---|
| कमाल संख्या | 65,432 | 97,654 | 97,643 | 87,531 |
| किमान संख्या | 23,456 | 45,679 | 34,643 | 13531 |

## प्रकरण 2 : बेरीज

योग्य उत्तर निवडून लिहा. ( एक गुणाचे प्रश्न )

1 a) 50,000

2 b) 52,000

3 c) 30,000

4 d) 20,000

5 b) 43,000

II 6) 1,000

7) 500

8) 3,000

9) 2,000

10) 900

11) 4,000

12) e) 40,000

13) c) 60,000

14) b) 62,000

15) f) 30,200

16) d) 28,500

17) a) 50,600

III) 18) 36417 + 32,532 = 68949

19) 28,490 + 61,306 = 89796

20) 12,973 + 46,016 = 58,989

21) 23,462 + 52,304 = 75766

22) 42806 + 34,063 = 76,869

23) 18,202 + 11,304 = 29,506

24) 52,320 + 10,000 = 62,320

25) 12,432 + 34,131 = 46,563

26) 12,403 + 13,524 = 25,927

27) 40,000 + 34,269 = 74,269

28) 36,907 + 53613 = 90,520

29) 24596 + 36578 = 61,174

30) 43,374 + 36,634 = 80,008

31) 25,700+2246+16,413=44,359

32) 60,000+24,00+28,500=90,900

33) 34,000+4,000+12,000=50,000

34) 9000+12000+3000=24,000

35) 11,000+2900+3900=17,800

